VOL. 5 | ISSUE 1 | JANUARY 2019

Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY PEER REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

*Issue Editors*

**Dnyaneshwar B, Maske**
**Gajanan Khiste**

*Chief Editor*

**Dr. Kalyan Gangarde**

*Associate Editor*
**Dr. Nandkumar N. Kumbharikar**

*Editors*
**Dr. Kanse C. B.**
**Mr. Salve S. R**
**Mr. Sonwane G. N.**
**Mr. Pandav R. S.**
**Mr. Paralkar S. D.**

**MGEW SOCIETY'S**
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**
**KALYAN (MAHARASHTRA)**

**Contact:** +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

## Contents


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Remarkable Theatre Groups In India: A Study | Dr.Chandrashekhar Kanase | 05 |
| 2. | Significance Of Studying Postcolonial Literature | Kailash A. Atkare | 08 |
| 3. | Comparative Study Of Vital Capacity Between Sports And Non-Sports Women | Dr. Sk. Md. Ataullah M.K. Jagirdar | 11 |
| 4. | Overview Of Open Access Books On Sports Science In Doab | Gajanan P. Khiste | 12 |
| 5. | Analysis Of Publication Productivity Of Blog | Dnyaneshwar B. Maske | 15 |
| 6. | A Study Of Surgical Strike As A Solution F or Proxy War In Jammu & Kashmir | K.M.Nagargoje | 18 |
| 7. | Fertility And Mortality Rate Of Population: A Case Study Of Latur District (Mh) *A Geographical Study* | Dr. Jaideep R. Solunke | 20 |
| 8. | Inflation Is A Big Problem In Developing Countries Like India .... | Dr. A. N. Chandramore | 23 |
| 9. | Research In Mass Communication | Dr. Rajendra Gonarkar | 25 |
| 10. | प्रस्थापित वाङ्मयीन मूल्यव्युहाचा आवर्तभेद करणारी समीक्षा | डॉ. किर्तीकुमार मोरे | 27 |
| 11. | संयुक्त महाराष्ट्र चळवळ : एक ऐतिहासीक अभ्यास | डॉ. राधाकृष्ण जोशी | 31 |
| 12. | आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान | डॉ.कदम विनोद गणेशराव | 33 |
| 13. | व्यक्तिमत्व विकासामध्ये नृत्य, नाटय, संगीत या कलेची भुमिका | डॉ चंद्रशेखर कणसे<br>केशव भागवत | 35 |
| 14. | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे परभणी जिल्हयाच्या विकासात योगदान | कैलाश गो खेडूळकर<br>डॉ. व्यंकट विळेगावे | 37 |
| 15. | भारत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील उच्चशिक्षणाच्या स्थितीचे तुलनात्मक अध्ययन | डॉ.पी.एस.पवार<br>देशमुख स्वाती सज्जनराव | 39 |
| 16. | भारत आणि शेजारी राष्ट्रांशी असलेला सिमावाद : एक सुरक्षात्मक अभ्यास | जी.एन.सोनवणे | 40 |
| 17. | ग्रामीण विकासातील उच्चशिक्षणाची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन | परळकर शशीकांत दत्तोपंत | 42 |
| 18. | महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांची संरचना : एक चिकित्सक अभ्यास | डॉ.नंदकुमार नारायणराव कुंभारीकर | 44 |
| 19. | मासिक पाळी आणि अंधश्रध्दा : एक अभ्यास | माने उषा यशवंतराव | 46 |
| 20. | वसंतराव नाईक यांचे हरित क्रांतीतील योगदान | डॉ.एन.डी.नाईक | 48 |
| 21. | महाराष्ट्रातील आदिवासी लोककलांचे स्वरूप आणि सादरीकरण : एक अभ्यास | रूक्मीणीकांत श्रीपादराव पांडव | 50 |
| 22. | महाराष्ट्रातील पर्यावरण आणि वनसंपदेचा भौगोलीक अभ्यास | नामदेव मंचा राठोड | 52 |
| 23. | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महाराष्ट्र परिषदेचे योगदान : एक ऐतिहासीक अध्ययन | एस.आर.साळवे | 54 |

10.

# प्रस्थापित वाङ्‌मयीन मूल्यव्युहाचा आवर्तभेद करणारी समीक्षा

प्रा.डॉ. किर्तीकुमार मोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड जि.परभणी

आमचे मित्र प्रा.डॉ.आनंद इंजेगावकर यांच्या 'आता क्रांती दूर नाही' आणि 'मराठीतील बंडखोर कविता : नवा शोध' या दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष ---- कविता संग्रहावर भाष्य करणारे प्रसिद्ध समीक्षक आणि प्रख्यात विचारवंत मित्रवर्य अनंत राऊत आणि उपस्थित मित्र हो !

आनंद इंजेगावकरांची दोन पुस्तके प्रकाशित होत आहेत याचा मनःस्वी आनंद आहे. त्याची दोन कारणे आहेत. एक हे की इंजेगावकर माझे काही काळ सहकारी राहिले आहेत आणि त्यांच्या पुस्तकावर बोलण्याची संधी मला मिळते आहे. दुसरे असे की, 'मराठीतील बंडखोर कविता : नवा शोध' या समीक्षा ग्रंथ रूपाने मराठी साहित्य विश्वाला फुले-आंबेडकरी वसा आणि वारसा लाभलेला एक उमदा समीक्षक दाखल होतो आहे. त्यांचा हा ग्रंथ परिभाषिक शब्दात सांगायचे झाल्यास आस्वादक समीक्षेचा ग्रंथ आहे. आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन ही समीक्षेची कार्ये मानली जातात. आपण ज्या कलाकृतीचा आस्वाद घेतो तिचे आकलन नीटपणे झाल्याशिवाय तर्कसंगत मूल्यमापन होऊ शकत नाही, यासाठीही हा क्रम महत्त्वाचा मानला जातो.

सर्जन परंपरेशी आमचा संबंध मध्ययुगापासूनच (म्हणजे जनाबाई, चोखामेळा, कर्ममेळा, बंका यांच्यापासूनचा) मानला तरी खूप मोठा कालखंड बकाल राहिलेला दिसतो. विद्यावंचनेतून आलेले अक्षरशत्रुत्त्व मैत्रीत रूपांतरीत होण्यासाठी म.फुले, छत्रपती शाहू आणि डॉ.बाबासाहेबांचा जन्म व्हावा लागला. फुले, शाहू, आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेचा नांगर महाराष्ट्राच्या प्रस्थापित मनोभूमीवर फिरला आणि बरीच उलथा पालथ झाली. म.फुले यांनी शिक्षणाच्या वरतून खालपर्यंत येणाऱ्या 'झिरपा' सिद्धांताला विरोध करून 'तळ'च्या मडक्याची चिंता वाहिली. बहुजन समाज शिकला तरच 'शिक्षित भारताचे' स्वप्न साकारेल हा सिद्धांत मांडला. संधी शिवाय समानता नाही या तत्त्वाने राजर्षी शाहूंनी उपेक्षितांच्या आरक्षणाची घोषणा केली. संधीचे आणि समानतेचे तत्त्व साधार सिद्ध केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित, वंचित, शोषितांच्या हक्कांना संविधानाचे अधिष्ठान दिले.

साठोत्तरी साहित्यप्रवाहाची पाळेमुळे शोधताना कितीही मागे जावे लागले तरी त्याची वैचारिक उर्जा फुले आंबेडकरी विचारांतच आहे हे निर्विवाद. ब्राह्मणी वा प्रस्थापित आधुनिक साहित्याचा प्रारंभही एकोणिसाव्या शतकातलाच असला तरी त्यांना प्रदीर्घ लेखन परंपरा होती. आस्वाद, आकलन, मूल्यमापनाचे त्यांचे सिद्धांत अलौकीकतावादी, केवलवादी, चैतन्यवादी स्वरूपाचे होते. अक्षरांशी हजारो वर्षांची मैत्री असलेल्या ब्राह्मणी साहित्यातील उपेक्षितांचा चेहरा कुरूप आणि हास्यास्पद होता. किंबहुना नव्हताच. त्यांचे कलेचे मानदंड 'माणूस' वजा करून प्राप्त होणाऱ्या 'निखळ आनंदाच्या गावा' जाणारे होते. म्हणूनच म.फुल्यांसारखा दृष्टा विचारवंत म्हणाला, ''तुमच्या पुस्तकातील विचारांशी आमुचा मेळ मिळत नाही.'' आमच्या वाङ्‌मयीन प्रथकत्त्वाचा हा प्रारंभ बिंदू होय. तर 'आमच्या देशात उपेक्षितांचे जग फार मोठे आहे... त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी लिहा !' हे आमच्या साहित्याचे प्रयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले. ''आमची कला मांडीवरच्या खुणा मोजत नाही.'' असे सांगत आमच्या कलेचे पृथकत्त्व अण्णाभाऊंनी अधोरेखित केले. प्रस्थापित रंजनवादी, कुटुंबवादी साहित्याला परिवर्तनवादी विचारकांनी दिलेल्या उत्तरातच परिवर्तनवादी साहित्याचे मानदंड स्थिरावले होते. 'माणसाची प्रतिष्ठा', 'माणूसपण' हा गौरवाचा विषय झाला पाहिजे. अनुभव हा कोणत्याही साहित्यकृतीचा प्राणच आणि तो समाजजीवनाच्या देहात राहतो. म्हणून माणूस वजा करून साहित्यकृतीचा अन्वयार्थ लावणे अशक्य. परंतु प्रस्थापित धर्म आणि ब्राह्मणी व्यवस्थेने निर्माण केलेल्या विभेदांच्या भिंतीनी जातींचे आवर्त तयार केले. श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाच्या भिंती उभ्या केल्या. जात, वर्ण, लिंगभेदांनी सारा समाज नागवला. विषमतेचे बलदंड बुरूज निर्माण केले. या साऱ्या व्यवस्थेला भारतीय संविधानाने सुरूंग लावला. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्यायावर आधारीत समाजाचे स्वप्न सत्यात उतरले. संविधानक मूल्यक्रांती प्रसवणरी सबंध परंपरा बुद्ध, फुले, शाहू, बाबासाहेबांच्या रूपाने उभी आहे. या परंपरेचे नवनित प्राशन करून जी परिवर्तनवादी साहित्य समीक्षा जन्म घेते. या परंपरेशी आनंद इंजेगावकरांची समीक्षा नाते सांगते.

या ग्रंथात एकूण अकरा लेख आहेत म्हणजे इंजेगावकर अकरा कवींच्या कवितेचे मूल्यमापन करतात. जे कवी त्यांनी निवडले त्यात मध्ययुगीन संत तुकाराम तर आधुनिक सामाजिक कवितेचे जनक म.फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यासह उत्तम कांबळे, परशुराम गिमेकर, अनंत राऊत, मारोती कसाब, स्मृ.यशवंत लोखंडे, प्रेमानंद बनसोडे, कमलाकर चव्हाण, गंगाधर ढवळे आदींचा समावेश आहे. ज्यांच्या कवितेवर ते लिहितात त्याबाबत त्यांची म्हणून एक भूमिका असलेली दिसते. या सर्व कवींना ते बंडखोर कवी म्हणतात, ''बंडखोर लेखन नेहमी विश्वकल्याणाची मागणी करीत असते. विश्वमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी विघातक शक्तींसोबत युद्ध पुकारीत असते.'' बंडखोर लेखनाबाबतची ही त्यांची भूमिका अंतर्मूख होऊन समजून घेतली पाहिजे. विषम व्यवस्थेशी जे जे युद्धसज्ज आहे ते माझे आहे. युद्धासाठी शस्त्रसज्ज असावे लागते परंतु लेखकाचा विश्वास 'रक्ताचा एकही थेंब न सांडता माणसाच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या व्यवस्थेवर' आहे म्हणजे लोकशाहीवर आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुभावावर, न्यायावर आहे. त्याने छेडलेले हे युद्ध संहारक नाही ते रचनात्मक आहे. 'काय केल्याने अक्षय बंधुप्रीती वाढेल' यासाठी लिहिणाऱ्यांना इंजेगावकर बंडखोर म्हणतात. फार लोकप्रिय नसलेल्या पण 'अंतरिचे धावे। स्वभावे बाहेरी' या न्यायाने लेखन करणाऱ्या नव्या कवींना प्रस्थापित करण्यासाठी इंजेगावकर लिहिताना दिसतात.

संत तुकारामांबद्दल लिहितांना इंजेगावकर परंपरेच्या साच्यात बसणारा तुकाराम सांगत नाहीत. शेंदरी देवतांवर हल्ला करणारा, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाची पेरणी करणारा, ढोंगी-सोंगी साधुंच्या दांभिकतेवर वज्र प्रहार करणारा आणि माणसात देव पाहणारा तुकाराम त्यांना भावतो. कवी श्रेष्ठ तुकारामांची व्यवस्थेवर आसूड ओढणारी बंडखोर भाषा त्यांच्या आस्थेचा विषय होते. संत तुकाराम त्यांना 'संतांच्या चळवळीचा प्राण' आणि 'विषमतेविरूद्धच्या लढाईतला योद्धा' वाटतो. त्यांचे हे आकलन सर्वस्पर्शी आहे.

राष्ट्रपिता जोतिराव फुले यांच्या 'अखंडां'वर लिहिताना त्यांच्यावरील पूर्व सुरींच्या संस्कारांचा वेध घेतात. जोतीरावांच्या वैचारिक जडणघडणीचे मूळ बुद्ध विचारात शोधतात. ब्राह्मणी व्यवस्थेने लादलेला अज्ञानाचा अंधःकार शुद्रादीकांच्या अवनतीचे कारण असल्याचे प्रतिपादन करतात. म.फुल्यांनी ब्राह्मणी व्यवस्थेवर उगारलेल्या आसुडांच्या फटक्यांची तीव्रता नि दाहकता कळण्यासाठी त्यांचा 'शूद्रातिशूद्राच्या कतलेआम भटांचे शिरकाण काव्य : जोतीरावांचे अखंड' हा लेख मुळातून वाचावा असा आहे. अखंडांचे मूल्यमापन करताना इंजेगावकरांची भाषाही अंगार ओकते. म.फुल्यांचा वसा आणि वारसा चालवणारे ते खरेखुरे सेनानी वाटतात. ते लिहितात, ''जोतीरावांच्या कवितेत ब्राह्मणी व्यवस्थेविरूद्ध खदखदणाऱ्या असंतोषाची परिणीती इतकी रौद्रभिषण बनते की तिच्या दणक्याने मनुवादी गडकोट आपोआप ढासळतात.'' किंवा ''ब्राह्मणरचित सर्व षडयंत्रांचा, कटकारस्थानांचा, मिथ्या थोतांडाचा पर्दाफाश करण्यासाठी सर्व पुराणग्रंथाचा पोलखोल जोतीराव आपल्या तिखट लेखणीने करतात.'' ही आणि या सारखी विवेचने वाचली की इंजेगावकरांच्या भाषेची ताकदही सहज लक्षात येते. ते कोणत्याही कवीबद्दल लिहिताना त्या कवीचे सारे काव्य आपल्यात रूजवतात मगच त्यावर लिहितात. त्यांच्या लेखणात कुठेही अंगचोरपणा नाही. एखाद्या कवीबद्दल त्याच्या उरात दाटलेले आकलनाचे कढ जसेच्या तसे शब्दबद्ध करण्याकडे त्यांचा कल दिसतो. एक प्रकारचा कणखरपणा नि सडेतोडवृत्ती त्यांच्या लेखनात दिसते. ही सडेतोडवृत्ती, परखडपणा, स्पष्टवक्तेपणा चळवळीत प्रत्यक्ष काम केल्यामुळे आणि चळवळीचे साहित्य वाचल्यामुळे झालेल्या संस्काराचा भाग असावा असे वाटते. म्हणूनच 'अखंडा'च्या पानोपानी विखुरलेली आर्यभट्टासाठीची संबोधने ते निर्धोकपणे लिहू शकले. 'खोटारडा, दंगेखोर, कुरापती, जगद्वेष्टा, लंडधनी, मानवतेस बट्टा, भोंदाडू, विषारी, निलाजरा' अशी कितीतरी संबोधने म.फुले यांनी अखंडातून वापरली. त्याचा निर्देश इथे दिसतो. ''जोतीरावांची ही अखंडादी कविता आधुनिक मराठी कवितेतील समाजक्रांतीची पहाट आहे.'' हे त्यांचे आकलन मर्मग्राही आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'ग्रामगीते'तील काव्याचा इंजेगावकरांनी परामर्श घेतला आहे. 'जगद्गुरू संत तुकोबारायांचे उर्वरीत कार्य पूर्ण करण्यासाठीच जणू राष्ट्रसंतांचा जन्म होतो' असे सांगून ग्रामगीतेतील कवितेच्या अंतरंगात ते शिरतात. राष्ट्रसंताचा प्रयत्नवाद, विषमतावादी विचारांवरील हल्ला, अंधश्रद्धादी रूढींवर प्रहार, फलज्योतिषवादी परंपरेविरूद्धचा एल्गार, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार, स्त्री सन्मान, वैराग्याचे मानदंड, शेंदरी देवतांचा घेतलेला समाचार, पिंडदानादी संस्कारांचा फोलपणा त्यांच्या काव्याआधारे स्पष्ट करून राष्ट्रसंत या उपाधीला ते कसे पात्र ठरतात याचा परामर्श घेतला आहे. संत तुकोबाराय आणि राष्ट्रसंत यांच्या भूमिकांतील साधर्म्यांची नोंदही केली आहे. यावरून त्यांच्या व्यासंगाचा प्रत्यय येतो. राष्ट्रसंतांनी केलेला लोकभाषेच्या वापराची वैशिष्ट्यपूर्णता सांगताना त्यांना बुद्धाच्या लोकोत्तर कार्याची आठवण होते. बुद्ध, फुले, डॉ.आंबेडकरांच्या वैचारिक वारश्याशी नाते सांगू पाहणारे सारेच महामेरू एकाच सूत्रात बांधण्याचा इंजेगावकरांचा प्रयत्न मनोज्ञ आहे. मात्र असे करताना त्याची वैचारिक मूस उलंघणारा कोणीही असो तो इंजेगावकरांच्या 'फटक्यां'चा धनी होतो.

राष्ट्रसंत तुकडोजींनाही सोडत नाहीत. त्यांच्यातील वैचारिक द्वंद्वांची ते धिटाईने मांडणी करतात. राष्ट्रसंताची बलस्थाने सांगताना त्यांची लेखणी जशी बळ घेऊन सरसावते तशीच त्यांच्या मर्यादा सांगतानाही तिला तलवारीची धार येते. वर्णव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या तुकडोजींबद्दल ते लिहितात, 'त्यांची ही कृती राष्ट्रहिताला बाधा आणणारी होती' याचा अर्थ असा की इंजेगावकर कोणत्याही संतकवीची कविता भक्त म्हणून पाहात नाहीत तर एका साक्षेपी अभ्यासकाच्या नजरेतून पाहतात. डोळसपणे पाहतात. 'नीरक्षर' विवेकापासून तसूभरही ढळत नाहीत. त्यांनी साकारलेल्या भूमिकेआड येणाराचे कत्तलेआम जणू ठरलेलेच मग तो कोणीही असो.

सामाजिक विकास प्रक्रियेत अलिकडील काळात खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण नावाने नवी व्यवस्था आली. जग जवळ आले. अर्थकारण बदलू लागले. या व्यवस्थेमुळे दलित, शोषित, पिडीत, बलुतेदार, कामगार नागवला गेला. माणसाच्या संवेदनांचे जगही पार बदलून गेले. नव्हे संवेदनाच हरवल्या. यंत्रकेंद्री झाल्या. सर्जनाचा परिसरही प्रभाववंचित राहिला नाही. 'जागतिकीकरणात माझी कविता' नावाच्या काव्यसंग्रहातून कवी उत्तम कांबळे यांनी नव्या यातनांचा प्रदेश चित्रित केला. त्यांच्या कवितेवर भाष्य करताना डॉ.आनंद इंजेगावकर लिहितात, ''समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि वैज्ञानिक दृष्टी या संविधान मूल्यांवर कवीची नितांत निष्ठा असल्यामुळे या संग्रहातील सर्वच कविता माणूसकीचे महान संविधानच मांडतात.'' हे भाष्य वाचताना असे वाटते की, भारतीय संविधानक मूल्यांच्या आधारेही नववाङ्मयीन प्रवाहातील साहित्याचे मूल्यमापन होऊ शकते. त्यासाठी संविधानक मूल्यकेंद्री समीक्षेची गरज आहे. अशा प्रकारची सैद्धांतिक समीक्षा डॉ.इंजेगावकर लिहू शकतील याचा विश्वास वाटतो.

उत्तम कांबळेच्या कवितेत माणूस हरवल्याचं दुःख चित्रित होतं. यांत्रिकीकरणाच्या कुरणात हरवलेल्या माणसाचा शोध घेऊन हे जग बदलण्याची भाषा ही कविता बोलते. वैश्विक खेडं निर्माण करणारांना खांदा देण्याची भाषा ही कविता बोलते. 'जागतिकीकरणाच्या क्रुर टापांचे आघात सोसण्यासाठी' ही कविता सामोरी जाते. असे इंजेगावकर लिहितात ते सार्थ होय.

या शिवाय परशुराम गिमेकरांच्या 'वडारवाडी' नावाच्या संग्रहावरही इंजेगावकर भाष्य करतात. कवी यशवंत लोखंडेच्या आंबेडकरी गीतांचा आशय अत्यंतिक तळमळीने समजुन घेतात. डॉ. आंबेडकर हा कलावंतांना पुरून उरणारा विषय असल्याचे प्रतिपादन करून 'आंबेडकरी गीत परंपरेतील पुढचे वामनरूप' म्हणून यशवंत लोखंडेचा गौरव करतात. यशवंताच्या लोकजागराचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ मौलिक आहे. आंबेडकरी गीतांनी सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतीमान केले याला इतिहास साक्षी आहे. म्हणून ही गीते सामाजिक प्रबोधनाची प्रेरके ठरतात. म्हणून ते लिहितात, ''ही गीतं ऐकणारांच्या आणि वाचणारांच्या मनात लाव्हारस उत्पन्न करतात. शिवशिवणाऱ्या हातांमध्ये क्रांतीसाठी पेटते पलिते देतात.'' इंजेगावकर आंबेडकरी गीतांकडे क्रांतीचे शस्त्र म्हणून पाहतात.

अनंत राऊत हे साहित्यविश्वाला लेखक, विचारवंत म्हणून परिचित पण ते कवीही आहेत आणि उत्तम कवी आहेत ही त्यांची ओळख इंजेगावकर करून देतात. 'अनंताची अभंगवाणी' या संग्रहात राऊतांनी अभंगाच्या फॉर्ममध्ये क्रांतिकारी कविता लिहिली. त्यांची कविता बंडखोर असून ते बंड कोणत्या स्वरूपाचे आहे हे सांगताना ते म्हणतात, ''हे बंड केवळ विरोधासाठी नसून नवमूल्य निर्मितीसाठी आणि नवभारताच्या पुनर्घटीतासाठी आहे.'' हे विश्लेषण यथार्थ आहे.

मारोती कसाब यांच्या 'पोरगं शेकत बसलंय' या कवितासंग्रहातील 'जातं' कवितेबद्दल त्यांचा अभिप्राय असा, ''कवी जातीच्या मोडतोडीची भाषा करतो. जातीच्या दुष्टचक्राला 'जात' या कवितेतून वाघनख लावतो'' किंवा गंगाधर ढवळेंच्या कवितेबद्दल ते म्हणतात, ''माणसाचे गीत गाणारी ही माणूसप्रधान कविता आहे'' किंवा प्रेमानंद बनसोडे यांच्या कवितेबद्दल ते लिहितात, '' 'द्रोह-विद्रोह' मधील कविता ब्राह्मणी व्यवस्थेशी जशी झुंजते, झगडते. तशी ती आपल्यातील घरभेद्यांचीही शिकार करते.'' हे सारे अभिप्राय वाचले म्हणजे इंजेगावकर यांच्या दृष्टी आणि दृष्टिकोनाचे गमक कळते. इंजेगावकरांची भूमिका स्पष्ट आहे. ती मानवकल्याणाची, विश्वकल्याणाची आहे. बुद्ध, फुले, शाहू, डॉ.आंबेडकरांच्या विचारातील वाघीणीच्या दुधाची तप्तता, तीक्ष्णता, तीव्रता, धग आणि रग त्यांनी पचवली आहे. त्यामुळे समीक्षालेखनासाठी त्यांनी केलेली निवड वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या लेखनाची अनेक वैशिष्ट्ये नोंदवता येतील.

आक्रमक लेखनशैली हे या लेखनाचे एक वैशिष्ट्य होय. या लेखनशैलीचे साधर्म्य म.फुल्यांच्या रोखठोक भाषेत शोधता येईल. फुले आंबेडकरी चळवळीतील एक सक्रीय कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या इंजेगावकरांच्या भाषेवरील चळवळीचा संस्कार उठावदारपणे दिसतो. त्याची भाषा आक्रमक आणि सडेतोड असली तरी विचारप्रवर्तक आहे. ती विध्वंसक नाही. रचनात्मकतेसाठी, नवनिर्मितीसाठी जुन्या जळमटांना जाळीत सुटते. 'जुने जाऊ द्या मरणा लागुनी' ही तिची प्रतिज्ञा आहे. नव्या रचनेसाठी, समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्वाच्या प्रतिष्ठापनेसाठी, माणसाच्या सन्मानाचे सुक्त रचण्यासाठी तो नवी भाषा घडवतो. कधी-कधी त्याची भाषा हळवे,

मधूर रूप धारण करतानाही दिसते. 'अगतिक वेदनांचा भरजरी पदर', 'रूंद काळजाचा परिघ', 'आंबेडकरी भूमीत फुलविलेला मळा' अशी काही वाक्य सबंध पुस्तकभर पहावयास मिळतील पण ती फार थोडी आहेत. कठोर काळजात असलेली संवेदनक्षम ओल फार सूक्ष्मपणे शोधावी लागते. पण त्याच्या रांगडेपणा, परखडपणाचीही माणसाला भूरळ पडावी अशा ताकदीचा हा समीक्षक आहे.

दुसरे वैशिष्ट्य असे की लेखक समीक्षेचे कोणतेच प्रस्थापित मापदंड पाळत नाही. समीक्षासुद्धा कोणत्याही परिभाषिक भाषा जंजाळत न अडकता तो भणंगपणे लिहित जातो. लेनिन म्हणाला होता, ''संगीत ऐकल्याने लोकांची डोकी हळवी बनतात आम्हाला तर लोकांची डोकी सडकून काढायची असतात.'' म्हणजेच काव्यानुकूल भाषेने हळवी माणसे निर्माण होऊ शकतील पण सामाजिक परिवर्तन घडविण्यास ती भाषा योग्य नव्हे. याच न्यायाने 'नाठाळाच्या माथा काठी हाणणारी' भाषा तुकारामांनी स्वीकारली. ही अकृत्रिमता इंजेगावकरांची ताकद आहे. ती त्यांनी जाणिवपूर्वक जोपासली पाहिजे. सत्त्व सोडून पळणारांना अस्तित्त्वाची अमीट ओळख निर्माण करता येत नाही. भाषेबाबत इंजेगावकर म.फुले यांचे बोट धरून चालले आहेत, ती त्यांना उर्जाच देईल या बाबत मला शंका नाही.

त्यांच्या लेखनप्रवासास मनःस्वी शुभेच्छा देतो आणि थांबतो. क्रांतिकारी जयभीम !..

⌘